नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १६/१२/२०२५ (मंगळवार )

## नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५ मतमोजणी अनुषंगाने सावनेर शहरात जाणारी जड वाहतुक वळविल्याबाबत...

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत सावनेर येथे नगरपरिषद सावनेर सार्वत्रिक निवडणुक २०२५ अनुषंगाने दि. २१/१२/२०२५ रोजी नगर भवन, नगर परीषद सावनेर येथे मतमोजणी होणार असुन गांधी चौक सावनेर येथे मोठया प्रमाणात गर्दी होवून वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४७ नागपूर भोपाल हायवे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ ई गोंडखैरी सावनेर हायवे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ छिंदवाडा सावनेर हायवे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ सावनेर मनसर हायवे रोडनी सावनेर शहरात जड वाहतुक आल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा व वाहतुक सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून तसेच अपघाताची शक्यता टाळण्याच्या अनुषंगाने वाहतुकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतुकीची कोंडी निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांकित अपघात होवू नयेत याकरीता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये सदर अधिसुचना दि. २१/१२/२०२५ चे सकाळी ०६.०० वाजता पासुन ते मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यंत जड वाहतुक खालील प्रमाणे वळविण्यात आली आहे.

**राष्ट्रीय महामार्ग क्र. ४७ नागपूर भोपाल महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ ई गोंडखैरी सावनेर महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ छिंदवाडा सावनेर महामार्ग, राष्ट्रीय**

**महामार्ग क्र. ७५३ सावनेर मनसर या महामार्गाने सावनेर शहरात येणारी वाहतुक सावनेर आउटर बायपासने वळविण्यात येत आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ०८ गोवंश जनावरांची सुटका, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १५/१२/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, बोलेरो पिकअप वाहन क्र. एम. एच.— ४०/वाय— ०४५१ वाहनामध्ये अवैधरित्या गोवंश जनावरांची भिसी कडुन मांगरूळ फाटया वरून नागपुर कडे वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा मांगरूळ फाटा येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप वाहन क्र. एम. एच.— ४०/वाय— ०४५१ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०८ गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप वाहन क्र. एम. एच.— ४०/वाय— ०४५१ किंमती ३,००,०००/— रूपये आणि ०८ गोवंश जनावरे किंमती ८०,०००/— रूपये असा एकुण किंमती ३,८०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. **उमरेड पोलीसांनी नमुद आरोपीचा तात्काळ शोध घेवुन आरोपी आर्यन भैय्या राउत, वय २६ वर्ष, रा. पेढरी टेकेवाडा, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपुर याला ताब्यात घेतले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता सदर वाहन त्याचेच मालकीचे असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.**

नमुद प्रकरणी आरोपीविरूध्द कलम ११(१) (डी) ११(१) (ई) ११(१) (फ) प्राण्यांचा छळ प्रतिंबधक अधिनियम (५), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, ११८, २३(१), १७७ महा. मोटार वाहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# कळमेश्वर पोलीस ,वनविभाग यांनी संयुक्त कारवाई करत शेतातील विहरीत पडलेल्या बिबटयाचा केला बचाब

दिनांक १६/१२/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत मौजा दहेगाव येथिल भिमेश्वर धोटे यांच्या शेतातीत विहरीत बिबट्या अडकुन पडल्याबाबत माहीती प्राप्त होताच. पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी कळमेश्वर आणि त्याचे अंमलदार , वन परिक्षेत्र अधिकारी, कळमेश्वर श्री प्रविण शिरपुर आणि त्यांचे पथक तसेच नागपुर येथील वनविभाग रेस्क्यु टीम ( बचाव पथक ) यांनी तात्काळ घटनास्थळ गाठले. सदर बिबटया हा शेतातील विहरीत अडकुन पडला होता. सदर बिबटयाला सुखरूप रित्या विहरीबाहेर काढुन त्याचा बचाव करण्यात आला.



# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६६५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १६/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ६६५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २६ आरोपी अशा एकुण ६० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण ११३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २९ आरोपी अशा एकुण १५४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६६५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १२ गुन्हे नोंद.

दिनांक १५/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ११,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन भिवापूर येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे एकुण ०४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे एकुण ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे एकुण ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण ०४ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १२ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ७२०० मिली देशी दारु, ८५ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ११७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने